॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

विकास विभाग

**कबचौउमवि/११ए/अध्या-१८१/प्रस्ताव २६-२७/४३/२०२६** **दि.२२/०१/२०२६**

## परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य/संचालक,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व परिसंस्था,**

**विषय:-** अध्यादेश १८१ अंतर्गत प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सेसला नविन संलग्नता देण्याबाबत, प्रस्ताव सादर करणेबाबत.....

**संदर्भ:-** १) विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/११/व्या.प्रमाणपत्र -पदविका/९२२/२००७, दि.०५/०६/२००७

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त संदर्भिय क्र. १ पत्रान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनूदान आयोग, नवी दिल्ली यांच्या COP या योजनेंतर्गत प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या **करिअर ओरिएंटेड कोर्सेस** सुरु करणेसाठी परवानगी मिळालेली आहे. व त्यासाठी अनूदान प्राप्त झालेले आहेत. असे अभ्यासक्रम, तसेच महाविद्यायांनी त्यांच्या स्तरावर स्वयंनिर्वाही (Self Funding) तत्वावर सुरू करावयाच्या वरील **करिअर ओरिएंटेड कोर्सेसच्या** परिचालनासाठी विद्यापीठाकडून तयार करण्यात आलेला अध्यादेश १८१ प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच सुधारीत नियमावली पाठविण्यात आली आहे.

तद्नुषंगाने ज्या महाविद्यालयांना / मान्यता प्राप्त परिसंस्था विद्यापीठ अनूदान आयोग, नवी दिल्ली यांच्या COP या योजनेंतर्गत अनुदान प्राप्त झालेले आहेत. अथवा ज्या महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर स्वयंनिर्वाही तत्वावर अध्यादेश १८१ अंतर्गत नविन **प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्से/ कोर्सेस शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन** त्रैवार्षिक कालावधीसाठी सुरु करावयाचे आहेत. तसेच ज्या महाविद्यालयांमधील **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून करिअर ओरिएंटेड कोर्सेसला दिलेल्या संलग्नतेचा त्रैवार्षिक कालावधी मे, २०२६ नंतर संपुष्टात येत आहे, अशा कोर्सेसला शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून नविन संलग्नता** घ्यावयाची आहे. अशा महाविद्यालयांनी नविन संलग्नता मिळण्यासाठीचे प्रस्ताव संदर्भाकींत अध्यादेश १८१ व मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने तयार केलेल्या सुधारीत नियमावलीस अनुसरून विहित नमुन्यात नियमित शुल्कासह **दि.२५/०२/२०२६ पर्यंत किंवा दि.२८/०२/२०२६ पर्यंत नियमित शुल्क अधिक प्रती अभ्याक्रम रू.२०००/- विलंब शुल्कासह एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) मा. वित्त व लेखा अधिकारी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या नावाने काढून** विद्यापीठाच्या **विकास विभागात संबंधित कोर्सेसच्या समन्वयकांनी समक्ष** सादर करावयाचे आहेत. टपालाने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येणार नाही. **(तसेच कोर्सेसचे प्रस्तावासोबत मुख्य समन्वयकांचे वैयक्तिक ई-मेल व संपर्क क्र. पाठविणे आवश्यक आहे.)** याची कृपया नोंद घ्यावी.

नियमावली, प्रस्तावासाठी अर्ज, प्रस्तावाचा नमुना, अभ्यासक्रमाबाबतचे प्रमाणपत्र व अभ्यासक्रमाच्या (Syllabus) पहिल्या व दुसऱ्या पृष्ठाचा नमुना यासोबत जोडलेला आहे.

➢ **टिप:- त्रुटी असलेले व अपुर्ण भरलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. व मुदतीत आलेले प्रस्ताव स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासु

सहा.कुलसचिव
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी:-**

१. मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव,
३. मा.उपकुलसचिव, संलग्नता विभाग, कबचौउमवि, जळगाव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

**विकास विभाग**

## *नविन अध्ययावत नियमावली *

**दिनांक:-२८/११/२०२३**

**अध्यादेश १८१ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नविन संलग्नता देण्यासाठीची नियमावली व कार्यवाही शुल्क**

**अ) नविन संलग्नता देण्यासाठीची नियमावली व कार्यवाही शुल्काबाबत:-**

१) ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान अयोग, नवी दिल्ली यांचेमार्फत प्राप्त झालेल्या अनुदानातून अथवा महाविद्यालय स्तरावर स्वयंनिर्वाही तत्वावर अध्यादेश १८१ अंतर्गत **प्रमाणपत्र /पदवीका/उन्नत पदविका/ पदव्युत्तर पदविका** अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरु केलेले आहेत. अशा अभ्यासक्रमांना विद्यापीठाने दिलेली त्रैवार्षिक संलग्नता **मे, २०२६ नंतर** संपुष्टात येत असलेल्या, सदर **करिअर ओरिएंटेड कोर्सेससाठी** विहीत मुदतीत नविन संलग्नता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यवाही शुल्कासह समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

२) संबंधित कोर्सच्या अभ्यासक्रमांना पुढील तीन वर्षासाठी नव्याने संलग्नता घेणे आवश्यक आहे. संलग्नता नव्याने देण्यात येईल.

३) संबंधित अभ्यासक्रमांस नवीन संलग्नता मिळविण्यासाठीचा प्रस्ताव सादर करतांना त्याचा अभ्यासक्रम (Syllabus) कालानुरूप अद्ययावत करुन, सदर अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात आल्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र सोबत जोडने गरजेचे आहे. **(मागील अभ्यासक्रमाची छायाप्रत प्रस्तावास जोडून पाठवू नये अद्ययावत अभ्यासक्रमच पाठवावा.)**

४) **अभ्यासक्रम (Syllabus) बाबत**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून ज्या महाविद्यालयांना अध्यादेश १८१ अंतर्गत **प्रमाणपत्र /पदवीका/उन्नत पदविका/ पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सेससाठी** संलग्नता नव्याने घ्यावयाचे आहे, अशा महाविद्यालयांनी सुरु करावयाच्या कोर्सचा अभ्यासक्रम (Syllabus) (अध्यादेश १८१ नुसार अभ्यासक्रमांची मांडणी, विषयसंख्या, स्वरुप, प्रात्यक्षिक परीक्षा, गुणदान पध्दत इतर बार्बीचा सर्व समावेशक अभ्यास करून) महाविद्यालय स्तरावर निर्धारीत करावयाचा आहे. अभ्यासक्रम तयार करणेसाठी महाविद्यालयीन स्तरावर समिती गठित करावी, सदर समितीत मा.अधिष्ठाता **(संबंधित विद्याशाखा),** प्राचार्य, **(संबंधित महाविद्यालय)** बहिस्थ विषयतज्ञ **(संबंधित विषय)** व समन्वयक **(संबंधीत कोर्स)** यांचा समावेश असेल. सदर गठित समितीच्या सभेसाठी महाविद्यालयात उपस्थित राहणाऱ्या समिती सदस्यांचा प्रवास व दैनिकभत्ता महाविद्यालयाने अदा करावयाचा आहे. सदर समितीने मान्य केलेल्या अभ्यासक्रमाची प्रत मा.अधिष्ठाता, बहिस्थ विषयतज्ञ, मा.प्राचार्य व समन्वयक यांच्या स्वाक्षरीच्या कोर्सनिहाय स्वतंत्र प्रमाणपत्रासह स्वतंत्र प्रस्तावासोबत सादर करावी.

**अपवादात्मक स्थितीत:-** मा.अधिष्ठाता **(संबंधित विद्याशाखा)** हे कार्यबाहुल्ल्यामुळे महाविद्यालयात आयोजित समितीच्या सभेस उपस्थित राहू न शकल्यास समितीतील उर्वरीत सदस्य म्हणजे, मा.प्राचार्य, बहिस्थ विषयतज्ञ **(संबंधीत विषय)** व समन्वयक **(संबंधित कोर्स)** यांच्या समितीने सदर अभ्यासक्रमाचा Syllabus चा कच्चा मसूदा तयार करून, तो कच्चा मसूदा संबंधित महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर मा.अधिष्ठाता **(संबंधित विद्याशाखा)** यांच्या निदर्शनास आणून द्यावा, त्यांनी सुचविलेल्या सुचना/ दुरुस्त्या समाविष्ठ करुन नवीन तयार केलेल्या अभ्याक्रमास मा.अधिष्ठाता यांच्याकडे पुनश्च: जाऊन त्यांनी सुचविलेल्या सुचना/दुरुस्त्यांची पूर्तता झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे, व त्या प्रतीवर

**Cont..२**

दुरुस्ती/बदलांबाबत त्यांची स्वाक्षरी घ्यावी, तसेच अभ्यासक्रमास अंतिम मान्यतेबाबतच्या प्रमाणपत्रावरही स्वाक्षरी घेवून इतर सदस्यांच्या स्वाक्षरीसह प्रमाणपत्र प्रस्तावासोबत विद्यापीठाकडे सादर करावे, तसेच वरील समितीने सदरचा अभ्यासक्रम तयार करतेवेळी अपवादात्मक स्थितीत मा.अधिष्ठाता सदरच्या सभेस उपस्थित न राहिल्यामुळे संबंधित विषयाच्या अभ्यासक्रमास अंतिम स्वरुप देणेसाठी केलेल्या कार्यवाहीचा सुयोग्य उल्लेख सदर सभेच्या सभावृत्तात करणे आवश्यक राहील,

५) **नव्याने संलग्नता देण्यासाठी कार्यवाही शुल्क आकारणेबाबत :-**

ज्या महाविद्यालयांमधील प्रमाणपत्र /पदवीका/उन्नत पदविका/ पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सच्या संलग्निकरणास तीन वर्ष पुर्ण झाले असतील, त्यांना पुढील तीन वर्षासाठी संलग्नता नव्याने घेण्याकरीता प्रत्येक कोर्ससाठी २५००/-

**ब) नवीन संलग्नता देण्यासाठीची नियमावली व कार्यवाही शुल्क खालीलप्रमाणे:-**

१) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या COP योजने अंतर्गत ज्या महाविद्यालयांना अनुदान प्राप्त झालेले आहे, अथवा ज्या महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर स्वयंनिर्वाही तत्वावर अध्यादेश १८१ अंतर्गत नवीन **प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सेस शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून** सुरु करावयाचे आहेत, अशा अभ्यासक्रमासाठी नवीन संलग्नता घ्यावयाची असेल त्यांनी, विहित नमुन्यात व विहित मुदतीत कार्यवाही शुल्कासह प्रस्ताव समक्ष सादर करणे आवश्यक आहे. ज्या महाविद्यालयांना पदविका (Diploma) अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करावयाचा असेल **त्यांच्याकडे अध्यादेश १८१ अंतर्गत प्रमाणपत्र (Certificate) अभ्यासक्रम सुरु असणे आवश्यक आहे.** ज्या महाविद्यालयांना पदविका (Diploma) तसेच उन्नत पदविका (Advanced Diploma) अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी त्यांच्याकडे अध्यादेश १८१ अंतर्गत प्रमाणपत्र (Certificate) व पदविका (Diploma) अभ्यासक्रम सुरु असणे आवश्यक आहे.

**२)** संबंधित कोर्सच्या अभ्यासक्रमांना पुढील तीन वर्षासाठी संलग्नता देणेबाबत करिअर ओरीएंटेड कोर्स को-ऑर्डीनेशन समितीकडून शिफारस झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**३) अभ्यासक्रमबाबत (Syllabus)**

अभ्यासक्रम तयार करणेबाबत उपरोक्त अ - ४ प्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी.

**४) यु.जी.सी.नवी दिल्ली यांचेकडून COP अंतर्गत प्राप्त अनुदानातून सुरु करावयाच्या करिअर ओरिएंटेड कोर्सला संलग्नता मिळण्यासाठी कार्यवाही शुल्क**

विद्यापीठ अनुदान आयोगाने COP योजनेंतर्गत दिलेल्या अनुदानातून प्रमाणपत्र/पदवीका/उन्नत पदविका/ पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सच्या परिचालनासाठी अनुदान मंजूर केलेले आहे, अशा अभ्यासक्रमांना अध्यादेश १८१ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुढील तीन वर्षासाठी संलग्निकरणाकरीता प्रती कोर्स रू.५०००/- (पाच हजार रूपये मात्र) कार्यवाही शुल्क आकारण्यात येईल.

**Cont..३**

५) **महाविद्यालय स्तरावर स्वयंनिर्वाही तत्वावर नव्याने सुरु करावयाच्या करिअर ओरिएंटेड कोर्सला संलग्नता मिळण्यासाठी कार्यवाही शुल्क**

अध्यादेश १८१ अंतर्गत महाविद्यालय स्तरावर स्वयंनिर्वाही तत्वावर प्रमाणपत्र/पदवीका/उन्नत पदविका/ पदव्युत्तर पदविका हे करिअर ओरिएंटेड कोर्स **नव्याने सुरु करावयाचे असल्यास अशा अभ्यासक्रमांना पुढील तीन वर्षासाठी संलग्निकरणाकरीता प्रती कोर्स रू. २५००/- कार्यवाही शुल्क आकारण्यात येईल.**

६) **नवीन संलग्नता लाभलेल्या अभ्यासक्रमांची विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समिती (LIC) कडून तपासणी करण्यात येईल.**

७) अध्यादेश-१८१ अंतर्गत सुरु होणाऱ्या करिअर ओरिएंटेड कोर्स/कोर्सेसच्या परीणामकारक परिचालनासाठी प्रवेश/परीक्षा शुल्क आकारणी, प्रत्यक्ष तासिका, विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रक, परीक्षांचे आयोजन, प्रत्यक्ष परीक्षा कालावधी, महाविद्यालयामार्फत गुणपत्रके /विद्यापीठाकडून स्वाक्षरी होऊन आलेली प्रमाणपत्रांचे वितरण, इत्यादीबाबत, मा.Career Oriented Course Co-Ordination Committee ने घेतलेल्या निर्णयानुसार कोणत्याही टप्प्यावर पत्राव्दारे /दुरध्वनीव्दारे माहिती घेणे, नियुक्त समित्यांच्या प्रत्यक्ष भेटी इ. माध्यमाव्दारे चौकशी/तपासणी करण्यात येईल. तसेच नियुक्त समिती सदस्य शक्यतो संबंधित महाविद्यालयाच्या जिल्हातील असावेत.

८) **कार्यवाहीचे टप्पे:-**

**१.** नव्याने प्रस्ताव विद्यापीठात पाठविण्याबाबत महाविद्यालयांना दि. ३१ जानेवारी पर्यंत परिपत्रक पाठविणे.
**२.** प्रस्ताव विद्यापीठात सादर करणे दि.१५ फेब्रुवारी पर्यंत
**३.** LIC समिती महाविद्यालयांना भेटी नियुक्ती देणे.
**४.** LIC समितीने महाविद्यालयांना भेटी दिल्यानंतर कार्यवाही अहवाल दि.३० जुन पर्यंत विद्यापीठात सादर करणे.
**५.** COCC समितीची सभा जुलै महिन्यात घेण्याबाबत नियोजन करणे.
**६.** COCC समितीचे इतिवृत्त बी.ओ.डी सभेत ठेवणे.
**७.** COCC कोर्सेसचे बी.ओ.डी सभेचे इतिवृत्त ए.सी.मध्ये माहितीस्तव ठेवणे.

महाविद्यालयास पाठवयाचे Circular (परीक्षेबाबतचे) सुधारीत करण्यात येत आहे. (परीक्षा व गुणपत्रक फी व विद्यार्थी शुल्क जमा करणे)

**********

**(४)**

**(महाविद्यालयाच्या लेटरहेड वरच खालील मजकूर असावा)**

जा.क्र.: दिनांक : / /२०

**प्रति,**
सहा. कुलसचिव, (अति.कार्य.)
विकास विभाग
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव

**विषय : शैक्षणिक वर्ष २० -२० साठी अध्यादेश १८१ अंतर्गत प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सला/कोर्सेसला संलग्नता नव्याने मिळणे बाबत..**

**संदर्भ :** विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/११ए/ /२० , दिनांक : / /२०

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकींत पत्राचे अनुषंगाने आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २० -२० साठी **अध्यादेश १८१ अंतर्गत प्रमाणपत्र/ पदविका / उन्नत पदविका / पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सेस** अंतर्गत एकूण ------- कोर्सला/कोर्सेसला नवीन संलग्नता मिळण्यासाठीचा प्रस्ताव रुपये .......... च्या धनाकर्षासह (डिमांड ड्राप्ट क्रमांक ................. दिनांक ..................) पाठवित असुन, कृपया सदर प्रस्तावाचा स्विकार व्हावा, हि विनंती.

**धनाकर्षाव्दारे (डिमांड ड्राप्ट व्दारे) पाठविलेल्या रकमेची विगतवारी खालील प्रमाणे :-**

१. **महाविद्यालयात स्वयंनिर्वाही तत्वावर कोर्स सुरु करण्यासाठी संलग्नता मिळणेसाठी**
नवीन संलग्नता प्रस्ताव निहाय एकुण अभ्यासक्रम x संलग्नता शुल्क रुपये
(................x रुपये २५०० = एकूण शुल्क रुपये ____________________

२. **यु.जी.सी.नवी दिल्ली कडून COP अंतर्गत प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने सुरु करावयाच्या कोर्ससाठी संलग्नता मिळणेसाठी**
नवीन कोर्सला संलग्नता मिळणेसाठी प्रस्ताव निहाय एकुण अभ्यासक्रम x संलग्नता शुल्क रुपये (.............. x रुपये ५००० ) = एकूण शुल्क रुपये ____________________

कळावे

आपला विश्वासू,

**सोबत :-डी.डी. व प्रस्ताव**

प्राचार्याची सही व शिक्का

**Cont..५**

(५)

**अध्यादेश-१८१ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०    -२०     पासून  प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सला नवीन संलग्नता मिळण्यासाठीचा प्रस्ताव**

**१)  महाविद्यालयाचे नाव व पत्ता  :-** ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२)  दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमाक  :-** ------------------------------------------------------------------------------------------

**३)  ई-मेल  :-** ------------------------------------------------------------------------------------------

**४)  यु.सी.सी.चा १२(B) दर्जा प्राप्त आहे काय?**  :-  होय / नाही

**५) आमच्या महाविद्यालयास अध्यादेश १८१ अंतर्गत यापूर्वी (शैक्षणिक वर्ष २०  -२०  पासून) संलग्नता  लाभलेल्या करिअर ओरिएंटेड कोर्स/कोर्सेसचा संलग्नतेचा त्रैवार्षिक कालावधी संपुष्टात आलेला असल्याने  त्या / त्यातील खालील कोर्स/कोर्सेसना नवीन शैक्षणिक वर्ष २०   -२०    पासून त्रैवार्षिक संलग्नता मिळावे.**

| अ.क्र. | करिअर ओरिएंटेड कोर्सचे पूर्ण नाव (इंग्रजीत) |
|---|---|
| | |

**६ ) आमच्या महाविद्यालयास यु.जी.सी.नवी दिल्ली यांचेकडून COP अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून सुरु करावयाच्या खालील करिअर ओरिएंटेड कोर्स/कोर्सेसला अध्यादेश १८१ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०    -२०      पासून त्रैवार्षिक संलग्नता मिळावी.**

| अ.क्र. | करिअर ओरिएंटेड कोर्सचे पूर्ण नाव (इंग्रजीत) | यु.जी.सी.चे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|
| | | |

उपरोक्त नविन संलग्नता मिळणेसाठी मागणी केलेल्या कोर्सेसचे अभ्यासक्रम (Syllabus) विद्यापीठाने दिलेल्या निर्देशान्वये  अध्यादेश १८१ नुसार अभ्यासक्रमाची मांडणी, विषय संख्या,  स्वरुप, प्रात्यक्षिक परीक्षा, गुणदान पध्दत इत्यादी बाबींचा सर्वसमावेशक अभ्यास करुन महाविद्यालय स्तरावर कोर्सनिहाय गठित समितीने अभ्यासक्रम तयार  करुन अंतिम स्वरुप दिलेले आहे. तशा आशयाचे **अभ्यासक्रमनिहाय (Syllabus) विद्यापीठाने दिलेल्या नमुन्यात प्रमाणपत्र सोबत जोडत आहोत.**

तरी उपरोक्त करिअर ओरिएंटेड कोर्स/कोर्सेसला संलग्नता मिळण्यासाठीचा प्रस्तावाचा स्विकार व्हावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

**सोबत :- वरीलप्रमाणे**

प्राचार्याची सही व शिक्का

**Cont..६**

(महाविद्यालयाच्या लेटरहेड वरच खालील मजकूर असावा)

## प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २० -२० पासून अध्यादेश १८१ अंतर्गत संलग्नता मिळणेसाठी प्रस्तावानुसार मागणी केलेल्या ------------------------------------------------------------------------------------------------------------------ या करिअर ओरिएंटेड कोर्सचा अभ्यासक्रम (Syllabus) तयार करणेसाठी विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालय स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती:-

१) प्रा.---------------------------------------------------------------- मा. अधिष्ठाता, (------------------- विद्याशाखा)
२) प्राचार्य,-------------------------------------------------------- मा.प्राचार्य,
३) प्रा.---------------------------------------------------------------- बहिस्थ विषयतज्ञ
४) प्रा.----------------------------------------------------------------समन्वयक (संबंधित कोर्स)

उपरोक्त समितीने अध्यादेश १८१ मध्ये नमूद केलेल्या (अभ्यासक्रमाची मांडणी, विषयसंख्या, स्वरुप, प्रात्यक्षिक परीक्षा, गुणदान पध्दत इ.) मुद्यांवर साधक बाधक चर्चाकरुन सदर कोर्सच्या अभ्यासक्रमास (Syllabus) अंतिम स्वरूप देवून मान्यता दिलेली आहे.

(स्वाक्षरी व शिक्का)
मा.प्राचार्य

(स्वाक्षरी)
मा. अधिष्ठाता, (------------------ विद्याशाखा)

(स्वाक्षरी)
बहिस्थ विषयतज्ञ
नाव/पदनाम/महाविद्यालयाचे नाव

(स्वाक्षरी)
समन्वयक (संबंधित कोर्स)
भ्रमणध्वनी क्र.

Cont..७

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**
**अध्यादेश १८१**

**महाविद्यालयाचे नाव**
...........................................................
...........................................................

**करिअर ओरिएंटेड कोर्सचे नाव**
...........................................................
...........................................................

**विद्याशाखा**
(...........................................................)

**शैक्षणिक वर्ष**
( २०   -२०   )

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**Ordinance १८१**

**College Name** : ........................................

**Title of the Course** : ........................................

**Aims/Objective of the Course** : ........................................

**Duration of Course** : १ Year

**Fees Structure** : ........................................

**Course Structure** : १) Paper - I ........................................

२) Paper - II ........................................

३) Practical Course ........................................

**Eligibility for admission** : ........................................

**Skeleton of Course** :

| Sr. No. | Paper | Name of the Subject | Theory/ Practical | Teac-hing Hours | Maximum marks alloted | | | Passing | | | Credit |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Exter nal | Inter-nal | Total | Exter-nal | Inter-nal | Total | |
| १. | Paper - I | | Theory | ९० | ६० | ४० | १०० | २४ | १६ | ४० | ६ |
| २. | Paper - II | | Theory | ९० | ६० | ४० | १०० | २४ | १६ | ४० | ६ |
| ३. | Paper-III | | Practical | १२० | ६० | ४० | १०० | २४ | १६ | ४० | ८ |

Minimum Staff :

Mode of Examination :

Detail syllabus :

====XXX===

**विकास विभाग**

*** अध्यादेश १८१ अंतर्गत करिअर ओरिएंटेड कोर्सेसच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी. ***

१. महाविद्यालयाचे नाव :- ____________________

२. कोर्सचे नाव :-____________________

३. कोर्सला मान्यता दिलेले वर्ष :-____________________

४. शैक्षणिक वर्ष :-____________________

५. विद्याशाखा :-____________________

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे पुर्ण नाव | लिंग | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष (प्रमाणपत्र/ पदविका कोर्स/ ॲडव्हान्स पदविका कोर्स/ पदवीत्तर पदविका प्रमाणपत्र) | प्रवेशित वर्ग (प्र. वर्ष/ द्वि. वर्ष/ तृ. वर्ष/ पदवीत्तर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

**प्रमाणपत्र**

वरील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित करण्यात येते की, त्यांची शैक्षणिक पात्रतेबाबत कागदपत्रांची पडताळणी केलेली असून ते योग्य असल्याचे नमुद करण्यात येत आहे. तसेच विद्यापीठ अध्यादेश १८१ नुसार वर नमुद केलेल्या अभ्यासक्रमासाठी वरील विद्यार्थ्यी पात्र आहे.

**समन्वयक** **मा. प्राचार्य**

**नाव/सही -**____________________

**मो.क्र.-**____________________ **(नाव/सही व महाविद्यालयाचा शिक्का)**